महाज्योती

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

**-:सुधारीत:-**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा मुख्य परीक्षा 2023 साठी आर्थिक सहाय्य योजनेचे तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील जे उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोग - पुर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एकरकमी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यासाठी आर्थिक सहाय्य योजनेकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **योजनेचे स्वरुप** :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग - पुर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व नागरी सेवा मुख्य परिक्षेसाठी पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना एकरकमी रक्कम रु.15,000/- आर्थिक सहाय्य महाज्योती मार्फत देण्यात येईल.

- **योजनेच्या लाभासाठी पात्रता** :-

1. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. तसेच नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती ती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
2. विद्यार्थी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) 2023 - पुर्व परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
3. ज्या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी इतर संस्था/सारथी, पुणे कडून अर्थसहाय्य मिळत आहे किंवा त्यासाठी अर्ज केला आहे अश्या उमेदवारांना सदर योजनाच्या लाभासाठी अर्ज करता येणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे** :-

1. आधार कार्ड
2. जातीचा प्रमाणपत्र
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र

4. पूर्व परीक्षेचे प्रवेश पत्र
5. बॅंकेचे तपशील (बॅंक पासबुक किंवा रद्द चेक)
6. पूर्व परिक्षा उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा :-**

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For MPSC Mains -2023" (State Services) यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्ज करण्याचा अंतिम दि.30/09/2023 आहे.
3. अर्जासोबत ओळखपत्र, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला, पूर्व परिक्षेचे प्रवेश पत्र, बॅंकेचे तपशील (बॅंक पासबुक किंवा रद्द चेक) आदि कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील. सदर कागदपत्रे स्व-सांक्षांकित करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावी.
4. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
5. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा : 0712-2870120/21.
   E-mail Id : mahajyotimpsc21@gmail.com

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर